# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट ३६० - २३** **दिनांक : - १७/१०/२०२३**

**मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाचे मुख्य रोड लगत बिल्डींगचा मलबा(डबर) टाकुन रोडवरील वाहतुकीस अडथळा निर्माण होईल व सर्व्हिस रोड बंद होईल तसेच सर्विस रोडवरील पावसाचे पाण्याचा प्रवाह बंद होवुन पावसाचे पाणी रोडवर साचुन रोड बंद होईल अशा प्रकारे मलबा (डबर) अनाधिकृतरित्या खाली करणाऱ्यांवर कारवाई केलेबाबत**

दिनांक १४/१०/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजताचे सुमारास पेल्हार पोलीस ठाणे हद्दीतुन जाणारा मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ०८ येथील मेनरोडच्या बाजुला पेल्हार बावखळ गावचे हद्दीत सर्विस रोडवर ०२ मोटार ट्रक हे बिल्डींगचा मलबा(डबर) टाकुन रोडवरील वाहतुकीस अडथळा निर्माण होईल व सर्व्हिस रोड बंद होईल तसेच सर्विस रोडवरील पावसाचे पाण्याचा प्रवाह बंद होवुन पावसाचे पाणी रोडवर साचुन रोड बंद होईल अशा प्रकारे मलबा (डबर) खाली करीत असताना ०२ ट्रक आढळुन आले आहेत. अशाच प्रकारे यावर्षी भर पावसाळयात महामार्गालगतच्या पाण्याचा निचरा होणारे नाले, ओढे बुजल्यामुळे तासनतास महामार्गावर वाहतुक कोंडी झाल्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. दिनांक २७/०९/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी, पालघर यांच्या रस्ते सुरक्षा समितीची बैठक पार पडली असता सदर बैठकीमध्ये गुजरात महामार्गालगतच्या सर्विस रोडवरील ठिकठिकाणी विनापरवाना टाकलेल्या जुन्या ईमारतीच्या डबर(मलबा) टाकणा-यांवर गुन्हे दाखल करुन प्रतिबंध करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी सुचित केलेले होते त्यांना प्रतिबंध करणेकामी महामार्गावर पेट्रोलींग करण्याबाबत सुचना दिलेल्या होत्या त्या अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाणे नेमणुकीतील पोलीस अंमलदार यांना मुंबई-अहमदाबाद महामार्गावर पेट्रोलिंग करीत असतांना दुपारी १२.०० वाजताचे सुमारास पेल्हार बावखळ गावचे हद्दीत मुंबई वाहिनीलगत मोटार हायवा ट्रक क्र.एम.एच/०४/एच.वाय/९१०९ हा रोडचे किना-यावर आपले गाडी मधील डबर(मलबा) खाली करण्याचे तयारीत असतांना मिळुन आल्याने संबंधितास गाडीतील डबर मालाबाबतचे सबंधित प्राधिकरणाचे परवानगीचे कागदपत्राबाबत विचारपुस करता त्याने सदर मालाबाबत काहीएक परवानगी कागदपत्रे नसल्याचे सांगितले तसेच त्यास सदरचा मलबा कोठुन आणला याबाबत विचारले असता काही एक समाधानकारक उत्तर दिलेले नाही १) मोटार हायवा क्र.एम.एच.०४-एच.वाय-९१०९ २) मोटार आयवा क्र.एम.एच.०४-एलक्यु-६६०७ यांचे चालक व मालक असे ०४ इसमांवर डबर(मलबा) खाली करण्याचे तयारीत असतांना मिळुन आले म्हणुन त्यांचेविरुध्द पेल्हार पोलीस ठाणेत १) गुन्हा रजि नं. ९३४/२०२३ व २) गुन्हा रजि नं.९३५/२०२३, भादंविसं कलम ३३६, ४३१, ३४ अन्वये असे **०२ गुन्हे नोंद** करण्यात आलेले आहेत. सदर गुन्हयामध्ये दोन्ही वरील नमुद वाहने डबर (मलबा) सहित पेल्हार पोलीस ठाण्यात जप्त करण्यात आलेली आहेत. तसेच भविष्यात अशाच प्रकारच्या कारवाया सुरुच राहतील. अशा स्वरुपाची बेकायदेशीर कृत्ये केल्यास गुन्हा दाखल होऊन दोषींना ०५ वर्षे कारावास किंवा द्रव्यदंडाची देखील शिक्षा होवु शकते.

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन), पेल्हार बिट मधील पो.उप.निरी.किरण वळवी, , पो.हवा. संतोष गायकवाड, रवि पाटील, पो.ना. वासु गावित हटकर तसेच स.फो.मारुती धायगुडे सर्व नेम. पेल्हार पोलीस ठाणे तसेच पो.हवा. अकबर सय्यद, लहु साळवे, नेम- मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- ३, विरार विभाग व पो.अं. राजेश टोपले, कृष्णा गोरखाणा, दोन्ही नेम- विरार वाहतुक शाखा यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.

**----0000----**